नियमीत फौजदारी खटला क्रमांक ७३०/२०२३
शासन विरुध्द मोनु उर्फ राजेंद्र यादव
कलम ३८० भादंस
निशाणी क्रमांक १५

अभियोग पक्षाचा साक्षीदार ५ ची जबानी
मी शपथेवर सत्य निवेदन करतो की,

माझे नावः- राजु सुरेश पांडे
वयः- ४० वर्षे धंदाः- चालक
रा. वरळी, मुंबई.

सरतपासणी सहा. सरकारी अभियोक्तया श्रीमती भोसले यांच्याकडुन

१. दिनांक १२/०४/२०२३ रोजी सहा. पोलीस निरीक्षक श्री. चेमटे यांनी मला सायंकाळी वरळी पोलीस ठाण्यात बोलावले होते. त्याठिकाणी पोलीसांनी मला मोबाईल चोरीच्या प्रकरणामध्ये पंचनाम्यासाठी बोलावले होते. मी पोलीस ठाण्यात गेलो तेव्हा पोलीसांनी मला एक निळया रंगाचा ओपो कंपनीचा मोबाईल दाखवला. त्याठिकाणी अन्य दोन व्यक्ती होते. मी त्यांना ओळखत नव्हतो.पोलीसांनी तो मोबाईल जप्त करुन सिल केला. त्यानंतर पोलीसांनी त्याचा पंचनामा तयार केला. निशाणी क्रमांक १३ वरिल तो पंचनामा आता मला दाखवण्यात आला, त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे.

२. तो मोबाईल ओपो कंपनीचा होता. तो मोबाईल दाखवल्यास मी ओळखु शकेन. आता मला दाखवलेला मोबाईल तोच आहे. तो वस्तु अ वर आहे.

सरतपास पुर्ण.

उलट तपास आरोपीकडुन स्वतः

आरोपीने चोरी केली किंवा नाही हे मला माहित नाही.

उलट तपास पुर्ण.

फेर तपास काही नाही.

दिनांक २१/१२/२०२३ समक्ष/ श्रवणोत्तर स्वीकृत

Sd/-

महानगर दंडाधिकारी
६२ वे न्यायालय, दादर, मुंबई